ता. ०८/०८/२०१८

# ...भद्र डोंगर परिसरात आंब्याची लागण



...अग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्यावतीने अरुण लाड ...गर परिसरामध्ये आंब्यांच्या झाडांची लागण करण्यात आली.

... होती. त्या वेळी ... दिली असती तर ... असणारे डोंगर ...

... आज पर्यावरण ...वड काळाची गरज आहे आणि फक्त वृक्ष लागवड करून उपयोग नाही, तर त्यांचे संवर्धन होणे गरजेचे आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. प्रताप लाड, प्रा. जगन्नाथ पाटील, डॉ. झेड. एच. संदे, एन. एस. एस. विभागप्रमुख नवनाथ गुंड, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## वृक्षलागवडीसाठी स्वतःची जमीन दिली

महाविद्यालयाचे मुख्य लिपिक रमेश जंगम यांनी महाविद्यालयाच्या वतीने लावण्यात येणाऱ्या झाडांकरिता, वीरभद्र डोंगराच्या पायथ्याशी आसणारी स्वतःची १५ गुंठे जमीन देऊ केल्याने क्रांती उद्योग समूहाचे प्रमुख अरुण लाड यांनी त्यांचे कौतुक केले.

महाविद्यालयाच्या वतीने मागील वर्षी झरी पार्श्वनाथाच्या परिसरामध्ये लावण्यात आलेली ५० आंब्याची झाडे पार्श्वनाथ परिसर मंडळाच्या सहकार्याने १०० टक्के जोपासली आहेत.



**कुंडल : जी.डी.बापू लाड महाविद्यालयातर्फे वृक्षलागवड करताना अरुणअण्णा लाड, प्राचार्य डॉ.के.एम. नलावडे.**

# जी. डी. बापू लाड महाविद्यालयातर्फे वृक्षारोपण

**कुंडल :** क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड महाविद्यालयातर्फे क्रांती उद्योग व शिक्षण समुहाचे प्रमुख अरुणअण्णा लाड यांच्या हस्ते विरभद्र डोंगर परिसरामध्ये १०० केशर व हापूस जातीच्या आंब्यांच्या झाडांची लागण करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या चार कोटी वृक्ष लागवड योजनेअंतर्गत उच्च शिक्षण विभागाच्या सुचनेनुसार क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या वतीने हापूस व केशर जातिच्या आंब्याच्या रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी अरुणअण्णा म्हणाले, शासनाचा हा उपक्रम स्तुत्य आहे. परंतू स्वर्गीय क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी. बापूंनी वृक्ष लागवड व संवर्धनाचे महत्व ओळखून वनविभागाच्या जागेमध्ये त्यावेळी वृक्ष लागवड करण्याची परवानगी वनविभागाकडे मागीतली होती. जर त्यावेळी शासनाने अशी परवानगी दिली असती तर आज कुंडलच्या परिसरामध्ये असणारे डोंगर हिरवेगार झाले असते.

ता-०८/०८/२०१८

# कुंडलच्या वीरभद्र डोंगरावर वृक्षारोपण

दै. पुढारी 10/7/17

कुंडल : वार्ताहर

कुंडल येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्यावतीने क्रांती उद्योग व शिक्षण समूहाचे प्रमुख अरूणअण्णा लाड यांच्याहस्ते वीरभद्र डोंगर परिसरामध्ये १०० केशर व हापूस जातीची आंबा रोपे लावण्यात आली.



कुंडल : क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्यावतीने वृक्षलागवड करताना अरुणअण्णा लाड, प्राचार्य डॉ. के. एम नलावडे व इतर.

यावेळी प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे , प्रा. प्रताप लाड, डॉ. संदे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाचे मुख्य लिपिक रमेश जंगम यांनी महाविद्यालयाच्या वतीने होणाऱ्या वृक्षारोपणाकरिता वीरभद्र डोंगर पायथ्याशी असणारी १५ गुंठे जमीन देऊ केल्याने क्रांती उद्योग समूहाचे प्रमुख अरूणअण्णा लाड यांनी कौतुक केले.

दै. पुढारी ता. 10/07/2017

दक्षिण महाराष्ट्र
सरी


जिल्हा

१८ जुलै २०१७

# बाऊ केल्याने मातृभाषेकडे दुर्लक्ष : डॉ. अशोक बाबर

ध्यमांच्या
भागातील
कर्षण हे
हत्यांच्या
असून,
ऊ केला
ृभाषेकडे
सल्याची
रावदादा
प्राचार्य
नी व्यक्त

स) येथे
ापू लाड
र व्या
ायोजित
होते.
समूहाचे



**क्रांतिअग्रणी महाविद्यालयाच्या वर्धापनदिनानिमित्त बोलताना प्राचार्य डॉ. अशोक बाबर व उपस्थित मान्यवर.**

प्रमुख अरुण लाड, सचिव शहाजी लाड, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे उपस्थित होते.

डॉ. बाबर पुढे म्हणाले, इंग्रजी माध्यमाच्या शाळा ग्रामीण भागामध्ये पोहोचल्या असल्याने सर्वसामान्य शेतकरी वर्ग या इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या टोलेजंग इमारती व तिथल्या हायफाय वातावरणाला भुलून आपल्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, या आशेने भरमसाठ फी भरून त्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये घालण्यासाठी धडपडत असतो. याकरिता तो असणाऱ्या शेतीवर; प्रसंगी कर्ज काढून फी भरत असल्याने त्याच्या कर्जाच्या बोजामध्ये वाढच होत आहे. मात्र आता इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडून पालकांचा होणारा भ्रमनिरास व यावर होणारा वाढता खर्च हे एक कारण शेतकरी आत्महत्येपाठीमागील अनेक कारणांपैकी एक असू शकते. शिक्षणाने आपण माणूस बनले पाहिजे, समता, स्वातंत्र्य, न्याय, व बंधुता ही मूल्ये जपली पाहिजेत व यातून विद्यार्थी क्रांतिकारी बनला पाहिजे.

प्रास्ताविक आणि स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम नलावडे यांनी केले. यावेळी सोलापूर महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कोटी यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. बाळकृष्ण वाघमारे, ज्येष्ठ प्रा. डॉ. प्रताप लाड, प्रा. जे. ए. पाटील; तसेच सर्व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा. गणेश खारगे यांनी केले. आभार प्रा. नवनाथ गुंड यांनी मानले.


# 'मातृभाषेकडे सर्वांचेच दुर्लक्ष : डॉ. बाबर

## कुंडल येथे जी.डी बापू लाड महाविद्यालयाचा १९ वा वर्धापनदिन उत्साहात

वार्ताहर
कुंडल

इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे ग्रामीण भागातील लोकांना असलेले आकर्षण हे शेतकऱ्यांचे आत्महत्येच्या कारणापैकी एक कारण असून, इंग्रजीचा विनाकारण बाऊ केला जात आहे. मातृभाषेकडे सर्वांचेच दुर्लक्ष होत असल्याची खंत पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक बाबर यांनी व्यक्त केली. ते कुंडल (ता. पलूस) येथे क्रांतीआग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या १९ व्या वर्धापनदिना निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी क्रांती उद्योग समुहाचे प्रमुख अरुण आण्णा लाड, सचिव शहाजी लाड, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. बाबर म्हणाले, इंग्रजी माध्यमाच्या शाळा ग्रामीण भागामध्ये पोहोचल्या आहेत. सर्वसामान्य शेतकरी वर्ग या इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या टोलेजंग इमारती व तिथल्या हायफाय वातावरणाला भुलून आपल्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे या आशेने भरमसाठ फी भरतात. तसेच त्यांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये घालण्यासाठी धडपडतात. या करिता तो शेतीवर प्रसंगी कर्ज काढून फी भरत असल्याने त्याच्या कर्जाचा बोजामध्ये वाढ होत आहे. तरीही आपल्या पाल्यास चांगले शिक्षण मिळाले पाहिजे व तो चांगला बनला पाहिजे हे ध्येय डोळ्यासमोर ठेऊन




**कुंडल : क्रांतिअग्रणी महाविद्यालयाच्या वर्धापनदिना निमित्त बोलताना प्राचार्य डॉ. अशोक बाबर, व उपस्थित मान्यवर.**

शेतकरी आपल्या पाल्यासाठी खर्च करतो आहे. पण आता इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडून पालकांचा होणारा भ्रमनिरास व यावर होणारा वाढता खर्च हे एक कारण शेतकरी आत्महत्ये पाठीमागील अनेक कारणापैकी एक असु शकते. कारण फी व टोलेजंगी इमारती प्रमाणे शिक्षण मिळणे गरजेचे आहे. त्यासाठीच पालकांची धडपड सुरु असते. पण असे न झाल्याने शेतकऱ्यांचा भ्रमनिराश होत आहे. ते म्हणाले, शिक्षणाने आपण माणूस बनले पाहिजे. समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधूता ही

**शेतकरी वर्गाला इंग्रजी माध्यामांच्या शाळांची पडतेय भूल**

मूल्ये जपली पाहिजेत व यातुन विद्यार्थी क्रांतीकारी बनला पाहिजे. तसेच त्यांच्यावर चांगले संस्कारही घडले पाहिजेत. लोकांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आदरही निर्माण झाला पाहिजे.

प्रारंभी प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम नलावडे यांनी केले. यावेळी सोलापूर महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कोटी यांनी मनोगत व्यक्त केले. यप्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बाळकृष्ण वाघमारे, ज्येष्ठ प्रा. डॉ. प्रताप लाड, प्र. जे. ए. पाटील तसेच सर्व प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश खारगे यांनी प्रा. नवनाथ गुंड यांनी आभार मानले.